महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

बीड । महाराष्ट्र
सोमवार दि. १६ मार्च २०२६
वर्ष ५ वे । अंक ३४३
पान १ । पाने ४
किंमत ३ रुपये

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com










## युद्धाचा फटका ; ऊस उत्पादक शेतकऱ्यांसमोर संकट

# 50 टक्के साखर कारखाने बंद होणार?

**मुंबई । वृत्तसेवा**

**सध्या जागतिक पातळीवर पेटलेल्या इराण-इस्त्रायल युद्धामुळे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय व्यापाराला त्याचा मोठा फटका बसल्याचं दिसून येत आहे. त्यात साखर उद्योगावरहीया युद्धाचा मोठा परिणाम झाला असल्याचं समोर येत आहे. ही युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यापासून केंद्र सरकारनं साखर कारखान्यांना निर्यातीसाठी दिलेल्या कोट्यानुसार होणारी साखर निर्यात ठप्प झाल्याचं समोर आल्यानं साखर कारखान्यांवर मोठं संकट उभं ठाकलं आहे.**



एकीकडे इराण-इस्त्रायल युद्धामुळे समुद्री मार्गावरील वाहतूक आणि व्यापार विस्कळीत झाल्याचं चित्रं आहे. याचदरम्यान, महाराष्ट्र राज्यासह संपूर्ण देशभरातून निर्यात होणारी साखर अनेक बंदरांवर अडकून पडल्यानं साखर कारखान्यांना त्याचा मोठा फटका बसला आहे. तसेच साखरेच्या दरातील स्थिरता आणि एफआरपी च्या वाढीमुळे राज्यातील साखर उद्योग मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे. महाराष्ट्र राज्यातील पुढील हंगामात ५० टक्के साखर कारखाने बंद पडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सुमारे ३ हजार कोटींचं नुकसान आणि ४ हजार ३१५ कोटींची एफआरपी थकीत असल्याची माहिती समोर आली आहे. महत्त्वाची बाब २०१९ पासून साखरेचे किमान विक्री मूल्य ३१ किलोवर स्थिर असून एफआरपी तब्बल सहावेळा वाढ करण्यात आली आहे. यामुळे साखर व्यवसाय कोलमडून पडल्याचं दिसून येत आहे. ▶▶ पान २ वर

## गुरव समाजाचा मुंबईत १७ मार्चला मोर्चा

**बीड । प्रतिनिधी**

अखिल गुरव समाज संघटनेच्या नेतृत्वाखाली सकल गुरव समाजाच्या वर्षानुवर्षे प्रलंबीत न्याय हक्कांच्या पुर्ततेसाठी मंगळवारी दि.१७ मार्च २०२६ रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. ▶▶ पान २ वर

## सासरच्या मंडळींच्या जाचाला कंटाळून

# रिक्षाचालकाची आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**

पत्नीचे कथित प्रेमप्रकरण आणि सासरच्या मंडळींकडून मिळणाऱ्या सततच्या शारीरिक व मानसिक त्रासाला वैतागून एका ४० वर्षीय रिक्षाचालकाने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी मृताच्या भावाने दिलेल्या तक्रारीवरून पेठ बीड पोलीस ठाण्यात पत्नीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आदम महेमुद शेख असे मृत व्यक्तीचे नाव असून ते मागील नऊ वर्षांपासून पेठ बीड भागातील मोहंमदीया कॉलनी येथे भाड्याने राहत होते. आदम हे चालक म्हणून काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असत. मात्र, मागील तीन वर्षांपासून त्यांची पत्नी सुहाना ऊर्फ मिना ही त्यांना नीट वागणूक देत नव्हती आणि तिचे कथितरीत्या तिचे प्रेमप्रकरण सुरु होते. या कारणावरून आदम यांनी तिला वारंवार समजावून सांगितले, पण तिच्या वागण्यात बदल झाला नाही. उलट सुहाना ही तिचे भाऊ आमेर आणि सुमेर, आई मुमताज आणि चुलत सासरा समीर यांना आदम यांच्या विरुद्ध ▶▶ पान २ वर

## शेत/पाणंद रस्ते योजना यशस्वीपणे राबविणाऱ्यांचा जाहीर सत्कार करणार-आ.धनंजय मुंडे

# मतदार संघातील शेत/पाणंद रस्ते योजनेचा घेतला आढावा

**परळी । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना उत्पादित शेतीमालाला ताजी बाजारपेठ मिळवून देण्यासह स्थानिक दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. या योजनेतून परळी मतदारसंघातील प्रत्येक शेत / पाणंद पक्क्या रस्त्याने जोडण्याचे आपले उद्दीष्ट असून, यासाठी मनरेगासह जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून जास्तीत जास्त कामे प्रस्तावित केली जावीत. या निधी बरोबरच विविध कंपन्यांच्या सीएसआर फंडातून देखील निधी उपलब्ध करून देण्यासाठी मी प्रयत्नशील असून, ही योजना १००% यशस्वीपणे राबवणाऱ्या ग्रामपंचायती तसेच प्रशासनातील अधिकाऱ्यांचा आपण जाहीर सत्कार करणार असल्याची भावना माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी आज परळी येथील एका बैठकीत बोलून दाखवली. परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघातील मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद



रस्ते योजनेतून प्रस्तावित कामांचा धनंजय मुंडे यांनी आज संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसह प्रमुख पदाधिकारी व विविध गावच्या सरपंच, उपसरपंच आदींच्या उपस्थितीत सविस्तर आढावा घेऊन व्यापक चर्चा केली. शेत / पाणंद रस्त्यांच्या प्रस्तावित कामांमध्ये ज्या ठिकाणी अतिक्रमणे किंवा अपिल आहेत अशी प्रकरणे ▶▶ पान २ वर

# संसदेला 'पिकनिक स्पॉट' बनवण्याचा प्रकार लोकशाहीसाठी घातक-मुंदडा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथे १२ मार्च २०२६ रोजी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि इतर विरोधी खासदारांनी संसदेच्या मकर प्रवेशद्वाराबाहेर केलेल्या 'चाय पार्टी'च्या निषेधार्थ केज मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी अक्षय मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली जोरदार निदर्शने केली. संसदेच्या नियमांचे उल्लंघन करून लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिराची प्रतिमा मलिन केल्याचा आरोप करत या आंदोलनाद्वारे काँग्रेसचा निषेध करण्यात आला. संसदेत केंद्रीय अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना अशा प्रकारे अशोभनीय कृत्य करणे ही अत्यंत खेदजनक बाब असल्याचे आंदोलकांनी यावेळी नमूद केले. पन्नगेश्वर साखर कारखान्याचे अध्यक्ष अक्षय मुंदडा यांनी यावेळी विरोधकांवर कडक शब्दांत ताशेरे ओढले. मकर प्रवेशद्वाराजवळ कुठलेही धरणे किंवा प्रदर्शन करू नये असे लोकसभा अध्यक्षांचे स्पष्ट निर्देश असतानाही राहुल गांधी व जवळपास २० खासदारांनी तिथे चहा-बिस्किटांचा कार्यक्रम आयोजित केला. ही बाब संसदीय



मर्यादांची पायमल्ली करणारी असून संसदेला 'पिकनिक स्पॉट' बनवण्याचा हा प्रकार लोकशाहीसाठी घातक असल्याचे मुंदडा यांनी सांगितले. अध्यक्षांच्या आदेशांची अवहेलना करून विरोधकांनी केवळ राजकीय स्टंटबाजी केल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. या आंदोलनादरम्यान केंद्र सरकारच्या कामगिरीचे समर्थन करतानाच काँग्रेसच्या कार्यपद्धतीवर टीका करण्यात आली. काँग्रेस पक्ष देशात घरगुती गॅसची कथित टंचाई असल्याचा चुकीचा भ्रम पसरवून नागरिकांची दिशाभूल करत असल्याचा दावा अक्षय मुंदडा यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी ▶▶ पान २ वर

# १८७८ उमेदवारांनी दिली लेखी परिक्षा

**बीड । प्रतिनिधी**

**२९ गैरहजर**

बीड जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदाच्या १४७ रिक्त पदांसाठी पोलीस शिपाई भरती २०२४-२५ प्रक्रियेत आऊटडोर परिक्षा पात्र ठरलेल्या १९०७ उमेदवारांसाठी आज लेखी परिक्षा घेण्यात आली. १९०७ पैकी २९ उमेदवार गैरहजर राहिल्याने एकूण १८७८ उमेदवारांनी ही लेखी परिक्षा दिली आहे. अत्यंत पारदर्शक पध्दतीने झालेल्या या प्रक्रियेचा लेखी परिक्षा हा महत्वाचा टप्पा होता. स्वत: पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, गृह विभागाचे डीवायएसपी उमाकांत कस्तुरे हे त्या ठिकाणी बंदोबस्तासह उपस्थित होते. दरम्यान आज सायंकाळी पोलीस दलाच्या वेबसाईटवर आन्सर की जाहीर करण्यात येणार असून त्यानंतर आक्षेपासाठी २४ तास दिले जाणार आहेत. आक्षेप प्रक्रिया पुर्ण होताच अंतीम निकाल जाहीर होणार असल्याचे सुत्रांनी सांगितले.

## प्रतिक्रिया पाठवा...

**मराठवाडा पत्र चा**

## ५ वा वर्धापन दिन

आपल्या सर्वांच्या आवडीचे लोकप्रिय दैनिक मराठवाडा पत्र गुरूवार (दि.१९ मार्च २०२६) रोजी पाच वर्ष पूर्ण करत यशस्वीपणे सहाव्या वर्षांमध्ये पदार्पण करत आहे... या पाच वर्षात आपण आम्हाला भरभरून प्रेम दिले... कोरोना महामारी सारख्या भिषण संकट काळात देखील आपण साथ दिली... पाचव्या वर्धापन दिनानिमित्त आम्ही १९ मार्च रोजी विशेषांक प्रकाशित करत आहोत... या अंकात तुमची प्रतिक्रिया आम्हाला हक्काने हवी आहे... पुढील वाटचालीसाठी आपल्या प्रतिक्रिया हेच आमचे बळ आहे... यामुळे आपण खालील ई- मेल आयडीवर किंवा व्हॉट्सअ‍ॅप क्रमांकावर प्रतिक्रिया पाठवाव्यात... दै. मराठवाडा पत्र परिवार आपल्या प्रतिक्रिया जानुन घेण्यासाठी उत्सुक आणि आतुर आहे...
दि. १७ मार्चपर्यंत आपल्या प्रतिक्रिया पाठवाव्यात. सोबत आपला पासपोर्ट आकाराचा फोटो आवश्य पाठवावा... आपल्या बोलक्या प्रतिक्रिया १९ मार्चच्या अंकात आम्हाला प्रसिध्द करायच्या आहेत...

■ प्रतिक्रीया पाठवण्यासाठी...
व्हाट्सअ‍ॅप नं. 9822152955
ई-मेल: Email-dailyamarathwadapatra2021gmail.com

दत्तात्रय नरनाळे
(संपादक : दै. मराठवाडा पत्र)

# गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विम्याची रक्कम दहा लाख रुपये करावी-मा.आ.भीमराव धोंडे

**आष्टी । प्रतिनिधी**

शेतात काम करताना शेतकऱ्यांवर वाघ किंवा बिबट्या सारख्या वन्यप्राण्यांनी हल्ला करुन ठार केले तर त्या शेतकऱ्याच्या वारसदारांना शासनाच्या वतीने दहा लाख रुपये देण्यात येतात, त्याचप्रमाणे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे शेतकरी विमा ही रक्कम दोन लाखावरून दहा लाख रुपये करावी अशी मागणी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केली. आष्टी तालुक्यातील पिंपळा



येथे आयोजित महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान कार्यक्रमात माजी आमदार भीमराव धोंडे हे कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदावरून बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर माजी आ. साहेबराव दरेकर, तहसीलदार वैशाली पाटील, नायब तहसीलदार पांडुरंग माडेकर,दत्ता वाडेकर व इतर मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना माजी आमदार ▶▶ पान २ वर

मराठवाडा पत्र



## संपादकीय

# जागतिक ऊर्जा राजकारण व भारत देश

प्रस्तावना : पश्चिम आशियातील तणाव आणि जागतिक अस्थिरता – पश्चिम आशिया हा जगातील सर्वात संवेदनशील आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा प्रदेश मानला जातो. तेल व नैसर्गिक वायूचे प्रचंड साठे, धार्मिक आणि राजकीय संघर्ष, महासत्तांची उपस्थिती आणि महत्त्वाचे समुद्री व्यापार मार्ग यामुळे या प्रदेशातील कोणतीही घटना संपूर्ण जगावर परिणाम करते. सध्या अमेरिका आणि इराण यांच्यात निर्माण झालेला तणाव पुन्हा एकदा जागतिक राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे. या संघर्षामुळे ऊर्जा बाजार, आंतरराष्ट्रीय व्यापार, समुद्री वाहतूक आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अमेरिका–इराण तणावाचा केंद्रबिंदू म्हणजे पर्शियन गल्फ परिसर आणि विशेषतः होरमुझ सामुद्रधुनी. ही अरुंद समुद्री वाहतूक पट्टी जगाच्या ऊर्जा पुरवठ्याची जीवनरेखा मानली जाते. जगातील सुमारे पाचव्या भागाचे कच्चे तेल या मार्गाने वाहतूक होते. त्यामुळे या प्रदेशातील कोणतीही अस्थिरता तेलाच्या किंमती, ऊर्जा पुरवठा आणि जागतिक अर्थव्यवस्थेला थेट प्रभावित करते. अमेरिका – इराण संघर्षाची ऐतिहासिक पार्श्वभूमी – अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव हा आजचा नाही. त्याची मुळे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आहेत. १९५०–६० च्या दशकात इराणमध्ये शाह मोहम्मद रझा पहलवी यांचे शासन होते आणि त्या काळात इराण अमेरिकेचा जवळचा मित्रदेश मानला जात होता. परंतु १९७९ मध्ये झालेल्या इस्लामिक क्रांतीनंतर इराणमध्ये आयातुल्ला खोमेनी यांच्या नेतृत्वाखाली नवीन इस्लामिक शासन स्थापन झाले आणि अमेरिकेविरोधी धोरणे स्वीकारली गेली. क्रांतीनंतर अमेरिकन दूतावासातील कर्मचाऱ्यांना ओलीस ठेवण्याच्या घटनेमुळे दोन्ही देशांमधील संबंध पूर्णपणे तणावपूर्ण झाले. त्यानंतर अमेरिका आणि इराण यांच्यात आर्थिक निर्बंध, राजनैतिक संघर्ष आणि अप्रत्यक्ष लष्करी संघर्ष सुरूच राहिले. २१ व्या शतकात या तणावाला नवे स्वरूप मिळाले . इराणच्या अणु कार्यक्रमामुळे अमेरिका आणि पाश्चात्य देशांमध्ये चिंता वाढली. २०१५ मध्ये इराण आणि पाच जागतिक शक्तींमध्ये अणु करार झाला. परंतु २०१८ मध्ये अमेरिकेने या करारातून माघार घेतली आणि इराणवर पुन्हा कठोर आर्थिक निर्बंध लादले. त्यानंतर तणाव अधिक वाढला. मध्यपूर्वेतील सामरिक समीकरणे – मध्यपूर्वेतील राजकारण अत्यंत गुंतागुंतीचे आहे . येथे तीन प्रमुख शक्ती केंद्रे मानली जातात – इराण, सौदी अरेबिया आणि इस्रायल. या तिन्ही शक्तींमध्ये स्पर्धा आणि परस्पर अविश्वास आहे. इराणचा प्रभाव इराक, सीरिया, लेबनॉन आणि येमेनमध्ये वाढत असल्याचे मानले जाते. लेबनॉनमधील हिझ्बुल्ला संघटना आणि येमेनमधील हूथी बंडखोर यांना इराणचा पाठिंबा असल्याचा आरोप केला जातो. यामुळे सौदी अरेबिया आणि इतर अरब देशांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष हा मध्यपूर्वेतील आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. इस्रायलला अमेरिकेचा ठाम पाठिंबा आहे, तर इराण इस्रायलच्या अस्तित्वालाच विरोध करतो. या परस्परविरोधी भूमिकेमुळे संपूर्ण प्रदेशात तणाव कायम राहतो. वादाचे प्रमुख कारण – अमेरिका–इराण संघर्षाची काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत : पहिले कारण म्हणजे अणु कार्यक्रम. अमेरिका आणि पाश्चात्य देशांचा आरोप आहे की इराण अण्वस्त्र विकसित करण्याचा प्रयत्न करीत आहे. इराण मात्र हा कार्यक्रम शांततापूर्ण उद्देशांसाठी असल्याचे सांगतो. दुसरे कारण म्हणजे तेल आणि ऊर्जा राजकारण. पर्शियन गल्फ प्रदेशात जगातील सर्वात मोठे तेलसाठे आहेत. त्यामुळे या प्रदेशावर प्रभाव मिळवण्यासाठी जागतिक शक्तींमध्ये स्पर्धा असते. तिसरे कारण म्हणजे इस्रायल–इराण वैर. इस्रायलला इराणकडून सुरक्षा धोका असल्याचे वाटते. त्यामुळे अमेरिका इस्रायलच्या बाजूने उभी राहते. चौथे कारण म्हणजे सामरिक समुद्री मार्ग. होरमुझ सामुद्रधुनी हा जगातील सर्वात महत्त्वाचा तेल वाहतूक मार्ग असल्यामुळे त्यावर नियंत्रण मिळवण्याचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा ठरतो. होरमुझ सामुद्रधुनी : जगाची ऊर्जा जीवनरेखा – होरमुझ सामुद्रधुनी ही इराण आणि ओमान यांच्या दरम्यान असलेली अरुंद समुद्री वाहतूक पट्टी आहे. ती पर्शियन गल्फ आणि अरबी समुद्र यांना जोडते. या मार्गाची रुंदी सुमारे तीस ते चाळीस किलोमीटर इतकी आहे. जहाज वाहतुकीसाठी ठराविक मार्ग केवळ काही किलोमीटर रुंद आहे. या सामुद्रधुनीचे महत्त्व  मोठे आहे. जगातील सुमारे वीस टक्के कच्चे तेल आणि मोठ्या प्रमाणात द्रवित नैसर्गिक वायू या मार्गाने वाहतूक होते. सौदी अरेबिया, कुवेत, इराक, कतार आणि संयुक्त अरब अमिरात यांसारख्या देशांमधून निघणारे तेल टँकर या मार्गाने जगभर पोहोचतात. जर हा मार्ग बंद झाला किंवा वाहतूक अडथळली तर जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर मोठा परिणाम होऊ शकतो. संघर्षाचे आर्थिक आणि लष्करी परिणाम – अमेरिका–इराण तणावामुळे ऊर्जा बाजारात अस्थिरता निर्माण होते. तेलाच्या किंमती वाढण्याची शक्यता असते. तेल टँकरवर हल्ले किंवा समुद्री चकमकी झाल्यास विमा खर्च वाढतो. जहाज कंपन्या जोखीम टाळण्यासाठी मार्ग बदलतात. लष्करीदृष्ट्या देखील हा संघर्ष गंभीर ठरू शकतो. ड्रोन, क्षेपणास्त्र आणि नौदल तळांवरील हल्ले या प्रदेशातील तणाव वाढवू शकतात. यामुळे संपूर्ण मध्यपूर्वेत युद्धाचे वातावरण निर्माण होऊ शकते. पर्यावरणीय दृष्ट्याही धोका मोठा आहे. तेल टँकरवर हल्ले झाल्यास मोठ्या प्रमाणात तेलगळती होऊ शकते, ज्यामुळे समुद्री पर्यावरणाला मोठा धोका निर्माण होतो. जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम भारत सरकारचे उपाय – ऊर्जा सुरक्षिततेसाठी भारताने काही महत्त्वाचे उपाय सुरू केले आहेत. रणनीतिक पेट्रोलियम साठे तयार करण्यात आले आहेत. तसेच तेल आयात विविध देशांकडून करण्यावर भर दिला जात आहे. रशिया, आफ्रिका आणि अमेरिका यांसारख्या देशांकडून तेल आयात वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. याशिवाय सौर ऊर्जा, जैवइंधन आणि हरित हायड्रोजन यांसारख्या पर्यायी ऊर्जा स्रोतांवर भर दिला जात आहे. ऊर्जा बचत आणि ऊर्जा कार्यक्षमतेसाठी देखील विविध धोरणे राबवली जात आहेत.

**– सरस्वती प्रकाश शेळके**

# पाणी वाचवा..!

फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीपासूनच यंदा उन्हाच्या झळा अनुभवायला येऊ लागल्या आहेत. यापूर्वी कधीही न अनुभवलेला उकाडा यंदा राज्यासह देशभरातील नागरिकांना भोगावा लागणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत पाण्याची मोठ्या प्रमाणात गरज भासते आणि याच दिवसांत नद्या, तळी, विहिरी कोरड्या पडू लागतात. ज्याचा परिणाम मानवी जीवनावर तर होतोच शिवाय पशु–पक्ष्यांचेही जीवनमान धोक्यात येते. आगामी काळात जगायचे असेल, तर आज पाण्याची बचत करणे अनिवार्य झाले आहे. बऱ्याचदा शेजारी पाजारी अन्य कोणी पाण्याची बचत करताना दिसत नाहीत,  मग मीच का पाणी वाचवावे, असे विचार मनात येतात: मात्र शेजारची व्यक्ती पैशाची उधलपट्टी करते म्हणून त्याचे पाहून आपण ती करत नाही, कारण पैशाचे महत्व, पैसे वाचवण्याचे महत्व, पैसे कमावण्यासाठी लागणारी मेहेनत याबाबतची आपल्या प्रत्येकाला आहे. आज पाणी सहज उपलब्ध होत आहे याचा अर्थ भविष्यातही ते सहज उपलब्ध होईलच असे नाही. त्यामुळे पाण्याच्या बचतीचे महत्वही आपण लक्षात घ्यायला हवे. आपल्या लहान सहान कृतीतून पाण्याची बचत आपल्याला करता येते. पाणी वाचवणे म्हणजे अस्वछ राहणे असे मुळीच नव्हे,आपल्या दैनंदिन स्वच्छतेसाठी उदा. आंघोळ, तोंड धुणे, हात धुणे आणि अन्य स्वच्छतेसाठी किती पाणी आपण व्यय करतो हें प्रत्येकाला ज्ञात असते. त्यामध्येही उन्हाळ्यात जर आपण शॉवरचा वापर करत असू तर बादलीचा वापर करून कित्येक लिटर पाणी आपण वाचवू शकतो, हात धुताना



हाताला हँडवॉश अथवा साबण लावेपर्यंत आपण नळ चालूच ठेवत असू तर तो बंद करायला हवा. कपडे आणि भांडी धुतांनाही हाच नियम पाळूया. भांड्यांना साबण लावताना नळ बंद ठेवूया. पिण्यासाठी आवश्यक तेव्हढेच पाणी घेऊया, जेणेकरून पाणी पिऊन झाल्यानंतर पेल्यात उरलेले पाणी अन्यत्र टाकावे लागणार नाही.  कपडे धुण्यासाठी आणि भांडी घासण्यासाठी शक्य असल्यास काही दिवस यंत्राचा वापर न करता हाताने धुण्याचा प्रयत्न करूया. घरातील एखादा नळ बिघाड झाल्याने त्यातून पाणी गळत असेल, तर तो तत्परतेने दुरुस्त करून घेऊया. झाडांना आवश्यक तेव्हढेच पाणी देऊया. एखाद्या ठिकाणी पाईपलाईनमधून पाण्याची गळती होत असेल तर त्वरित पाणी खात्याला कळवून त्या ठिकाणी दुरुस्ती करून घेऊया. पाणी वाचवण्याचे महत्व आपल्या घरातील लहानग्यांनाही सांगुया. आपण जर सोसायटीत राहत असू तर सोसायटीची मिटिंग घेऊन पाणी वाचवण्याचे प्रयत्न सामूहिकपणे करण्याचा प्रयत्न करूया  ! पाण्याला जीवन असे म्हटले जाते. फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये महागडे जेवण जेवल्यानंतरही ते पचण्यासाठी जेवणांनंतर किमान ग्लासभर पाणी तरी आपल्याला हवेच असते. पाण्याविना जीवनाची आपण कल्पनाही करू शकत नाही. काही देशांमध्ये पाणीटंचाईमुळे इंधनाच्या दरात पाणी विकले जात असल्याच्या बातम्या आजवर आपण वाचल्या आहेत. आज आपण पाणी नाही वाचवले तर भविष्यात भारततही अशीच परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यासाठी पाणी वाचवण्याची सवय आतापासून अंगवळणी पाडूया !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# पान १ वरून

## ५० टक्के साखर...

राज्यात आगामी काळात उसाचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच प्रतिकूल हवामानामुळे निम्म्या कारखाने बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचं दिसून येत आहे. साखरेला उठाव नसून, बी–हेवी मोलॅसिस तयार करण्याची क्षमता असूनही राज्याला मर्यादित कोटा (२० टक्के) मिळाला आहे. तसेच निर्यात न झाल्याने गोदामात साखरेचा साठा वाढून देशांतर्गत दरात घसरण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्याचाच मोठा आर्थिक फटका बसून कारखाने अडचणीत येण्याची दाट शक्यता आहे. देशातून परदेशात पाठवण्यात येत असलेला शेतमाल युद्धजन्य परिस्थितीमुळे अनेक बंदरे आणि समुद्रातील मार्गांवरच अडकून पडल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे निर्यात प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊन मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असून याचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत असल्याचं सांगितलं जात आहे. अशाचप्रकारे साखर निर्यात ठप्प राहिली, तर ऊस उत्पादक शेतकऱ्यांचं मोठं नुकसान होण्याची शक्यता आहे. काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी राज्यातील साखर कारखान्यांच्या आर्थिक नुकसानीवर सडेतोड भाष्य करताना साखर कारखाना हा उद्योग ग्रामीण भागाला चालना देणारा उद्योग असून गेल्या दोन वर्षांत सहावेळा ऋझ वाढली पण चडझ एकदाही वाढली नसल्याचं निदर्शनास आणून दिलं होतं. याचवेळी त्यांनी काही कारखान्यांना छउऊ च्या माध्यमातून मदतीची गरज असताना मदत केली जात नाही, असा आरोपही केला. साखर उद्योगासाठी सरकारी पातळीवर मुख्यमंत्री काय निर्णय घेणार आहेत? अशी विचारणाही सतेज पाटलांनी सहकार मंत्र्यांकडे केली होती. तसेच यावेळी त्यांनी सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांना टोला लगावताना तुमच्या काळात ५० टक्के साखर कारखाने बंद पडले असा इतिहास लिहू देऊ नका, असा खोचक टोला विधानपरिषदेतील काँग्रेसचे गटनेते सतेज पाटील यांनी सहकार मंत्री बाबासाहेब यांना लगावला होता. यावर बाबासाहेब पाटील यांनी लवकरच राज्य पातळीवरील साखर कारखानदारांची बैठक घेण्याचं आश्वासन दिल्याची माहिती समोर आली होती.

## मतदार संघातील...

तातडीने सोडवावीत यासाठी एक विशेष कृती कार्यक्रम तयार करावा, तसेच अडचणीची अपिले किंवा अतिक्रमणे निकाली काढण्यासाठी आवश्यक तिथे आपणही स्थानिक ग्रामस्थांच्या मध्यस्थीने मदत करू, असेही धनंजय मुंडे या बैठकीत म्हणाले. प्रत्येक गावातील कामे प्रस्तावित करताना संबंधित गावचे सरपंच तसेच प्रतिनिधींच्या सूचना विचारात घ्याव्यात अशा सूचनाही धनंजय मुंडे यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर आबा चव्हाण, जिल्हा परिषदेचे माजी गटनेते अजय मुंडे, बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, शिवाजीराव शिरसाट, राजाभाऊ पोळ, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, प्र. तहसीलदार विलास तरंगे, गटविकास अधिकारी राजवर्धन भोसले यांसह विविध गावचे सरपंच, पदाधिकारी तसेच संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

## रिक्षाचालकाची...

भडकावत असे. या चिथावणीमुळे सासरची ही मंडळी आदम यांना वारंवार शिवीगाळ करून मारहाण करत असत. तू सुहानाला तलाक दे, आम्ही तिचे दुसरे लग्न लावून देतो असे म्हणत त्यांचा मानसिक छळ केला जात होता. या त्रासाला कंटाळून १२ मार्च २०२६ रोजी आदम यांनी सुरत येथे राहणारा आपला भाऊ आवेद आणि बहीण निलोफर यांना फोन करून आपण आत्महत्या करत असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी तेलगाव नाका परिसरातील पापनेश्वर मंदिर परिसरात झाडाला फाशी घेतली. या प्रकरणी आवेद महेमुद शेख यांच्या तक्रारीवरून पेठ बीड पोलिसांनी पत्नी सुहाना आदम शेख, मेव्हणा आमेर आबेद शेख, सुमेर आबेद शेख, सासू मुमताज आबेद शेख आणि चुलत सासरा समीर यांच्या विरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८, ११५(२), ३५२ आणि ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे . पोलीस उपनिरीक्षक मन्सूर शहा या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## गोपीनाथ मुंडे शेतकरी...

भीमराव धोंडे यांनी सांगितले की, भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेती उत्पादनावर भारतीय अर्थव्यवस्था टिकून आहे परंतु शेतकऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या उत्पादित केलेल्या मालाला देखील भाव मिळत नाही तसेच शेतात काम करताना अनेक शेतकऱ्यांचा विविध प्रकारे अपघात होतो, यामध्ये सर्पदंश होणे व इतर प्रकारे अपघात होतात. त्यासाठी शासनाने स्वर्गीय गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना लागू केली परंतु ती त्यासाठी दोन लाख रुपये वारसांना दिले जातात, ही रक्कम अतिशय कमी आहे. ज्यावेळी एखाद्या शेतकऱ्यावर वाघ किंवा बिबट हल्ला करून ठार करतो त्या शेतकऱ्यांच्या वारसांना दहा लाख रुपये दिले जातात त्याप्रमाणे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे अपघात विमा रक्कमेत दहा लाख रुपयांपर्यंत पण वाढ करावी. याप्रसंगी माजी आमदार साहेबराव दरेकर तहसीलदार वैशाली पाटील व इतरांची भाषणे झाली.यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विवाद ग्रस्त प्रकरण निकाली काढून आदेश पारित करणे. फेरफार अदालत घेऊन ७/१२ वाटप करण्यात आले. मंडळ अधिकारी कार्यालय बळकटीकरण करणे विद्यार्थ्यांना रहिवाशी प्रमाणपत्र वाटप करण्यात आले, रस्त्याच्या नोंदी अभिलेखात नोंद घेऊन ७/१२ वितरित केले.घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू वितरित करणे तसेच लक्ष्मी मुक्ति योजना राबविणे विविध अर्थसाह्य योजनेच्या संचिका जमा करणे. ग्रीस्टॅक योजना कार्यान्वित करुन मतदान कार्ड वाटप करणे ई–शिधापत्रिका वाटप करणे ई–केवायसी करणे. याप्रसंगी पांडुरंग गावडे, चिंतामण मोरे, रामदास शेंडगे, चंद्रकांत साके,संजय धायगुडे, सरपंच उध्दवराव मोढवे,सरपंच ज्ञानदेव सासवडे, सरपंच  संजय रक्टाटे ,सरपंच– सागर दरेकर, सरपंच विकास अमृते,सरपंच  योगेश शेळके, सरपंच सौ. सिमाताई भवर, सरपंच संजय विधाते, सरपंच राजेंद्र खुरंगे, अशोक कुताळ, चंद्रकांत शेंडगे, पत्रकार युवराज खटके, राजेंद्र शिंदे,हुसेन सय्यद, निखिल भवर, दादा विधाते , सरपंच  बंकट परकाळे,सरपंच  प्रदिप गव्हाणे, सरपंच भाऊसाहेब गावडे,सरपंच ईश्वर मेटे,दादासाहेब झांजे यांच्या सह ग्रामस्थ उपस्थित होते.

## संसदेला पिकनिक...

यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार देशातील प्रत्येक नागरिकाला ऊर्जा सुविधा पुरवण्यासाठी कटिबद्ध असून विरोधक केवळ निराधार अफवा पसरवत असल्याचे ते म्हणाले. या निषेध आंदोलनात भाजपचे विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## गुरव समाजाला...

यामध्ये राज्यभरातून समाज बांधव सहभागी होणार आहेत, असे गुरव समाज संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष संजय कल्याणराव गुरव यांनी दिलेल्या प्रसिध्दी  पत्रकाद्वारे म्हटले आहे.
यासंदर्भात जेजुरी येथील बैठकीत आंदोलनाची रणनीती ठरवण्या सोबतच समाजातील लोकप्रतिनिधींचा जाहिर सत्कार करण्यात आला. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. आण्णासाहेब शिंदे व जेजुरी नगरपालिका नगराध्यक्ष जयदिप बारभाई यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन केले जाणार आहे. गुरव समाज अनेक प्रमुख प्रलंबीत मागण्यासाठी आक्रमक झाला आहे. यामध्ये देवस्थान इनाम वर्ग तीनच्या जमिनींचा प्रश्न मार्गी लावून त्यावरील वतन खालसा करणे, जमिनींचा फेर सर्व्हे करून बेकायदेशीर हस्तांतरण रद्द करणे, मुळ सनदधारकांना ताबा मिळवून देणे यांसारख्या मुद्द्यांचा समावेश आहे. सर्व मंदिर ट्रस्टमध्ये गुरव समाजाला ५० टक्के विश्वस्त पदे मिळावीत, पुजार्यांचा वंश परंपरागत पुजेचा हक्क अबाधीत रहावा आणि ६० वर्षावरील पुजार्यांना निवृत्ती वेतनासह ५ हजार रूपये मासिक मानधन तातडीने लागू करावे, सन १९५० च्या सार्वजनिक विश्वस्त कायद्यातील कलम ३६ मधील दुरूस्ती, ओबीसी आरक्षणांतर्गत लोकसंख्येनुसार निधीत वाढ व समाजात होणारे हल्ले रोखण्यासाठील ॲट्रॉसिटी कायद्यासारख्या कडक तरतुदींची मागणी प्रलंबीत आहे. आंदोलनाला राज्यातील विविध संघटनांनी पाठींबा दिला आहे अशी माहिती प्रसिध्दीपत्रकाद्वारे बीड जिल्हाध्यक्ष संजय कल्याणराव गुरव यांनी दिली आहे.

# इराणने रान पेटविले...

अमेरिका इजराइल आणि इराण यांच्यातील युद्धाची ठिणगी आज सर्व जगातील बाजारपेठेवर परिणाम करणार आहे. अमेरिका आणि इजराइल यांनी इराणमध्ये संयुक्तरीत्या कारवाई केली याला इराण ने चोख प्रत्युत्तर दिले. इराणमधील इस्पान तेहरान यासारख्या औद्योगिक शहरावर व लष्करी सामर्थ्य असलेल्या शहरावर अमेरिका आणि इजराइल यांनी बॉम्बवर्षाव केला. अगदी बेचिराख करून टाकले. पण ईराणी सैन्याने प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने आपल्या सैन्य सामर्थ्याखाली अंकित ठेवलेले इराक, सौदी अरेबिया, ओमान, कुवेत यूएई या देशातील अमेरिकेचे हवाई तळ ,लष्करी दल, विमानतळे यांना लक्ष केले. रिव्हर्स टेक्नॉलॉजी च्या माध्यमातून कमी किंमतीत असलेले आणि अतिशय परिणामकारक शस्त्रे जसे सुसाईड ड्रोन, बॅलेस्टिक मिसाइल, रॉकेट याची मोठ्या प्रमाणात निर्मिती इराण मार्फत करण्यात आलेली आहे. त्यामुळे अतोनात नुकसान होऊन देखील इराणची प्रति उत्तर देण्याची शक्ती अजूनही वर्षानुवर्षे चालणार असल्याचे स्पष्ट दिसून येते. अमेरिकेला हे युद्ध फारसे लांबणीवर टाकायचे नव्हते. लवकर विजय निश्चित करावयाचा होता.काही आठवड्यात या युद्धाचा निर्णय लागेल या अतिरेकी भावनेतून अमेरिकेने आणि इजरायल ने ही सैन्य कार्यवाही केली खरी परंतु आता तशी लक्षणे दिसून येत नाहीत.हे युद्ध लांबणीवर पडल्यावर सर्व जगावर व्यापारी दृष्टिकोनातून फार मोठ्या प्रमाणावर परिणाम होणार आहे. ईरान ने हॉर्मुझ खाडी बंद करून तेल व गॅस च्या व्यापारावर एक प्रकारे बंदी घातली आहे. ही बंदी अमेरिकेला सहजासहजी मोडीत काढता येणार नाही हे देखील तितकेच सत्य आहे. ही परिस्थिती अशीच राहिली तर जपान, चीन, भारत, पाकिस्तान, बांगलादेश, व्हिएतनाम या सह अनेक देशांमध्ये आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण होऊ शकते. दळणवळण ठप्प होऊन जागतिक मंदी येऊ शकते. पेट्रोल डिझेल गॅस चा भडका होऊन जनतेमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होऊ शकतो. सामान्य जनतेसाठी मिळणाऱ्या सेवा काही दिवसातच दुपटीने वाढू शकतात. या सगळ्या रोषाचे खापर जनता अमेरिका इजराइल यांच्यासह स्थानिक सरकार वर फोडेल. हे युद्ध थांबले नाही आणि स्थिती पूर्ववत झाली नाही तर जग मोठ्या संकटाकडे जाईल. आजच्या घडीला इराण कडे अणुबॉम्ब आहे का आणि असेल तर पुढे काय होईल ही कल्पना न केलेली बरी. पण अमेरिका आणि इराण तसेच इजराइल व इराण यांचे वैमन्यस्य केवळ इरान ने अणुबॉम्ब तयार करू नये यामुळेच आहे हे संपूर्णतः मान्य नाही. इराण या देशात अमेरिकन डॉलर ला महत्व नाही. जगाच्या १४ टक्के तेल साठाआणि मुबलक गॅस इराण कडे आहे आणि यावर फक्त इराणचे नियंत्रण आहे. या बाबीवर पण अमेरिकेचा डोळा आहे आणि त्या माध्यमातून अमेरिका आणि इजराइल यांनी इराणवर युद्ध थोपविले असे देखील म्हणता येईल. पण हार्मोझ सारखी खाडी बंद करून जागतिक व्यापाराला कोंडीत पकडण्याचे काम इराण ने केले आहे. याचा दबाव निश्चितच मोठ्या प्रमाणात अमेरिकेवर पडला असून खरंच असे म्हणता येईल की इराणने रान पेटविले आहे..




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र



# आदित्य शिक्षण संस्थेच्या स्नेहसंमेलनात क्रीडा-संस्कृतीचा जल्लोष

# विविध स्पर्धांत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**बीड । प्रतिनिधी**

आदित्य शिक्षण संस्था, बीड भव्य वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा 'जल्लोष १०.०' मोठ्या उत्साहात संपन्न झाला. ५ ते १४ मार्चदरम्यान आयोजित या स्नेहसंमेलनात क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आपले कौशल्य सादर करण्याची मोठी संधी मिळाली. आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या स्नेहसंमेलनामध्ये आदित्य शिक्षण संस्थेतील विविध शाखेतील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांच्या क्रीडा व सांस्कृतिक कलागुणांना वाव देण्यासाठी क्रिकेट, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, रस्सीखेच, रनिंग, गोळाफेक, थाळीफेक, क्ले मॉडेलिंग यांसारख्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या.



स्नेहसंमेलनाच्या शेवटच्या दोन दिवसांत आयोजित भव्य सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थितांची विशेष दाद मिळाली. नृत्य, नाटिका, एकपात्री अभिनय, विविध सांघिक सादरीकरणांमधून विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांची प्रभावी झलक दाखवली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा, सीए गिरीश गिल्डा उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षणासोबत क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांनाही महत्त्व देण्याचे त्यांनी आवाहन केले. प्रामाणिक अभ्यास करून पालकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी विद्यार्थ्यांनाच संस्थेचा केंद्रबिंदू मानले. सर्व शाखेमध्ये आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळे आदित्य शिक्षण संस्था बीडमध्ये उत्कृष्ट शिक्षणाचे केंद्र म्हणून ओळख निर्माण करत असल्याचे त्यांनी नमूद केले. या स्नेहसंमेलनाचे आयोजन डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. प्रा. श्याम भुतडा व डॉ. विकास गर्जे यांच्या नियोजनाखाली कार्यक्रम झाला. यावेळी डॉ. पी. के. कुलकर्णी, डॉ. राहुल खडके, सागर गायकवाड यांच्यासह संस्थेतील विविध शाखेतील प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. सतीश कचरे यांनी केली. आभारप्रदर्शन डॉ. विकास गर्जे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आदित्य शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी संतोष लहाने, सीए गिरीश गिल्डा उपस्थित होते. तसेच संस्थेतील विविध शाखांचे प्राचार्य उपस्थित होते. डॉ. हिमांशू श्रीवास्तव, डॉ. विवेक कुलकर्णी, प्रा. श्याम भुतडा, डॉ. सतीश कचरे, डॉ. अमोल सानप, प्राचार्य डॉ. विकास गर्जे, प्रा.पुष्पराज राठोड, प्रा.बालाजी बहिरवाळ, डॉ. दीपक पवार, डॉ. रूपाली शिंदे,प्रा. प्रदीप काठोळे उपस्थित होते. प्रा. ढोबळे, प्रा. खेडकर, प्रा. मोरे, प्रा. सातपुते आदी प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले. संपूर्ण क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमाला सर्व शाखांचे शिक्षक, कर्मचारी, मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

**● क्रीडा स्पर्धेत या शाखांची चमकदार कामगिरी**

- क्रिकेट (मुले) : विजेते -नर्सिंग शाखा, उपविजेते - फार्मसी शाखा
- क्रिकेट (मुली) : विजेते -दंत शाखा, उपविजेते -कृषी शाखा
- व्हॉलीबॉल (मुले) : विजेते - कृषी शाखा, उपविजेते - दंत शाखा
- व्हॉलीबॉल (मुली) : विजेते -दंत शाखा, उपविजेते - कृषी शाखा
- कबड्डी (मुले) : विजेते -कृषी शाखा 'बी' संघ, उपविजेते - कृषी शाखा'ए' संघ
- कबड्डी (मुली) : विजेते -दंत शाखा, उपविजेते -कृषी शाखा
- खो-खो (मुले) : विजेते -फार्मसी शाखा, उपविजेते - नर्सिंग शाखा
- खो-खो (मुली) : विजेते -कृषी शाखा, उपविजेते - नर्सिंग शाखा.

## महात्मा फुले समता परिषदेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निखिल शिंदे

### जिल्हा कार्याध्यक्षपदी अविनाश उगले तर बीड शहराध्यक्षपदी नितीन राऊत यांची निवड

**माजलगाव । प्रतिनिधी**

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद बीड जिल्हा कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांच्या शिफारशीनुसार समता परिषदेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निखिल शिंदे, जिल्हा कार्याध्यक्षपदी अविनाश उगले तर शहराध्यक्षपदी नितीन राऊत यांची निवड समता परिषदेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांनी केली आहे. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचा विस्तार आणि संघटन व्हावे यासाठी समता परिषदेचे संस्थापक



राष्ट्रीय अध्यक्ष कॅबिनेट मंत्री ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या अध्यक्षतेखाली तर माजी खासदार समीरभाऊ भुजबळ, आ. पंकजभाऊ भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे समता परिषदेच्या राज्य कार्यकारिणीची बैठक रविवार दि. १५ मार्च २०२६ रोजी संपन्न झाली. यावेळी विविध जिल्ह्यातील कार्यकारणी बरोबरच बीड जिल्ह्याची नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली. यावेळी गेल्या अनेक वर्षांपासून समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांच्या नेतृत्वाखाली आणि ना. छगनरावजी भुजबळ साहेब, माजी खासदार समीरभाऊ भुजबळ, आ. पंकजभाऊ भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली समता परिषदेत अहोरात्र तन-मन-धनाने कार्य करणारे समता परिषदेचे आणि ॲड. सुभाष राऊत यांचे खंदे समर्थक निखिल शिंदे यांची बीड जिल्हाध्यक्षपदी, अविनाश उगले यांची बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी तर नितीन राऊत यांची बीड शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. सदरील निवडीमुळे बीड जिल्ह्यातील समता परिषदेच्या पदाधिकारी आणि समता सैनिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून निखिल शिंदे, नितीन राऊत आणि अविनाश उगले यांच्या निवडीचे बीड जिल्ह्यामध्ये स्वागत करण्यात आले आहे.

## बालाघाट प्रतिष्ठानच्या शिवजन्मोत्सवात 'बालाघाट रत्न' पुरस्कार व भव्य वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

बालाघाट प्रतिष्ठान आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त बालाघाट रत्न पुरस्कार सोहळा व वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. ह.भ.प. विष्णुपंत लोंढे महाराज यांच्या शुभहस्ते हा सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे होत्या, तर डॉ. सत्येंद्र पाटील, गंगाधर नाना काळकुटे, ज्ञानदेव काशीद, किरण भगत व ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी धर्मराज रसाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी २०२५ मध्ये शासकीय सेवेत रुजू झालेल्या युवक-युवतींना 'बालाघाट रत्न' पुरस्काराने गौरविण्यात आले. यामध्ये कु. शिल्पा रघुनाथ घोडके (PSI), कु.



दिक्षा अनिल करडुले (महापारेषण सहाय्यक अभियंता), चि. महेश छत्रभुज पवार यांच्यासह २० जणांचा सन्मान करण्यात आला. तसेच उत्कृष्ट पत्रकारितेसाठी अशोक काळकुटे (TV ९ मराठी ) आणि उत्कृष्ट मृदंगाचार्य म्हणून अनिकेत लांडे यांचाही सन्मान करण्यात आला. बालाघाट प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित वक्तृत्व स्पर्धेत दहा केंद्रांतील ८० शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेत प्रथम क्रमांक जगताप यश बिबीशन, अमृता बाळासाहेब घोडके व अमृता दिगंबर मेंगडे यांनी मिळवला. स्पर्धेतील बक्षीसांसाठी विविध मान्यवरांनी आर्थिक सहकार्य केले. या सर्व कार्यक्रमांचे आयोजन बालाघाट प्रतिष्ठान, नामदेव घोडके सर, वानगाव चे सरपंच संतोष जोगदंड यांनी केले आणि सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याचे आयोजकांनी सांगितले.

## पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाली येथे राज्यस्तरीय व्याख्यानाचे आयोजन



**बीड । प्रतिनिधी**

मौजे पाली येथील पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाली येथे पीएम श्री योजनेअंतर्गत राष्ट्रीय आविष्कार अभियान अंतर्गत राज्यस्तरीय व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रख्यात व्याख्याते डॉ. प्रकाशजी राधेश्याम का यांनी अंतराळातील तंत्रज्ञान आणि पृथ्वीचा अभ्यास : सुदूर संवेदना व जीआयएसची ओळख या विषयावर शालेय विद्यार्थ्यांना कृतीयुक्त मार्गदर्शन केले. आपल्या व्याख्यानामध्ये त्यांनी अंतराळातील मानवनिर्मित उपग्रह, त्यांचे कार्य, भविष्यातील गरज तसेच कृषी संशोधन क्षेत्रातील त्यांचा होणारा उपयोग याबाबत सखोल माहिती दिली. विद्यार्थ्यांना अंतराळ संशोधनाची ओळख करून देताना त्यांनी सुदूर संवेदना (रिमोट सेन्सींग) आणि जीआयएस (जीआयस) तंत्रज्ञानाचे महत्त्वही सोप्या भाषेत स्पष्ट केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक लाड सर होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. पायके सर, श्री. आघाव सर, श्रीमती खाडे मॅडम, श्रीमती मुंढे मॅडम, श्री. डोंगर सर, श्री. मेजर साळुंके, श्री. साबळे सर, श्रीमती म्हेत्रे मॅडम, श्रीमती मुळे मॅडम, श्रीमती जाधव मॅडम, श्रीमती वाकचौरे मॅडम, श्रीमती जगताप मॅडम, श्रीमती सांगळे मॅडम व श्रीमती हंगे मॅडम यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मुंढे मॅडम यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रीमती रंजना म्हेत्रे यांनी केले.

## दिंद्रुडच्या व्यंकटेश पब्लिक स्कूलचे स्नेहसंमेलन

### बाल कलाकारांचे विविध सामाजिक विषयांवर समाज प्रबोधन

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील व्यंकटेश पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन शुक्रवारी (दि.१३) उत्साहात संपन्न झाले. बालकलाकारांनी विविध सामाजिक विषयांवर नाटक, एकांकिका, वैयक्तिक व समूह नृत्याद्वारे प्रबोधन व मनोरंजन करत प्रेक्षकांची वाहवा मिळवली. बाल कलाकारांचे विविध गुणदर्शन पाहण्यासाठी प्रेक्षकांनी गर्दी केली होती. सिध्देश्वर महाविद्यालयाचे प्रा. डॉ.रमेश गटकळ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. परळी पंचायत समितीचे माजी सभापती लक्ष्मण पौळ, आसाराम जिरे, दत्ता पाटील डाके, रामप्रभू मुंडे, सुहास झोडगे, संस्था अध्यक्ष प्रदीप ठोंबरे,सौ. स्वाती ठोंबरे सह दिंद्रुड पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. महापुरुषांच्या प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



व्यंकटेश पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती, नवोदय, एमटीएस परीक्षांत गुणवत्ता मिळवली, क्रीडा क्षेत्रात दैदीप्यमान कामगिरी केली असून सर्व विद्यार्थ्यांवर वैयक्तिक लक्ष ठेवत त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यासाठी तत्पर असल्याचे प्रस्ताविकात अध्यक्ष प्रदीप ठोंबरे यांनी सांगितले. ऑपरेशन सिंदूर, गड आला पण सिंह गेला हे तानाजी मालुसरे यांचे नाटक, हुंडाबंदी विषयी नाटिकांनी प्रेक्षकांना विशेष भारावून टाकले. देशभक्तीपर, मराठीची अस्मिता, मराठमोळ्या लावण्यांसह विविध गीतांवर बाल कलाकारांनी बहारदार नृत्य सादर केले. विविध गाण्यांसाठी बालकलाकारांनी केलेले प्रभावी सूत्रसंचालन लक्षवेधक ठरले. शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमात परिश्रम घेतले. प्राचार्य भीम मस्के यांनी प्रस्ताविक तर सूत्रसंचालन उपप्रचार्य शेख इरफान यांनी केले.

## कोणत्याही देशाचा डाटाबेसच विकासाची गुरुकिल्ली– प्राचार्य डॉ. विश्वास कदम

**बीड । प्रतिनिधी**

सामाजिक शास्त्रातील संशोधनामध्ये डाटा हा कसा संकलित केला जातो तसेच संकलित केलेल्या माहितीतील विश्वासहार्यता ही शास्त्रीय पद्धतीने तपासून पाहिली पाहिजे कारण कोणत्याही देशाचा डाटाबेस हाच त्या देशाच्या विकासाची गुरुकिल्ली असतो असे प्रतिपादन अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक प्राचार्य विश्वास कदम यांनी केले. येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात सामाजिकशास्त्रे मंडळाच्या वतीने दिनांक १४ मार्च २०२६ रोजी विद्यार्थी कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत संशोधन प्रकल्प लेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी ते उद्घाटक तथा बीजभाषक म्हणून बोलत होते.

# जातीच्या भिंती तोडा, आपली माती, माणस आणि नाती जपा; 'गुरुकृपा' मंचावर संदीप पाठक भावनिक

**माजलगाव। प्रतिनिधी**

आम्ही लहान होतो, त्यावेळी जाती धर्माच्या भिंती फार खुज्या होत्या, मागच्या काळात अनेकांनी त्यावर अनेक विटा रचून त्या माणसापेक्षाही मोठ्या केल्या आहेत. आपल्याला त्या भिंती तोडल्या पाहिजेत. जाती धर्माच्या भिंती तोडून आपली माती, माणस आणि नाती जपा असे भावनिक आवाहन अभिनेते संदीप पाठक यांनी केले. 'गुरुकृपा ' शिक्षण समूहाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. प्रा. स्नेहल पाठक, संजय मालानी, डॉ. विनोद काकडे, व्यंकटेश वैष्णव, पांडुरंग उगले, डॉ रंगनाथ गोळेकर, डॉ. भांगरे,गुरुकृपा चे डॉ यशवंत राजेभोसले यांची यावेळी उपस्थिती होती. यावेळी संदीप पाठक यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना आपल्या जुन्या आठवणी जागवल्या. कितीही मोठे झालात तरी आपल्या मातीला आणि आपल्या आईवडील,



मित्रांना विसरू नका, हेच लोक आपले पाय जमिनीवर राहायला मदत करत असतात असे सांगितले. आईवडिलांना कर्जबाजारी करून लग्नावर कोट्यवधी खर्च करण्याची आजची पद्धत बदलण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले तसेच जाती धर्माच्या पलीकडे जाऊन माणूसपण जपा, हा संस्कार इथल्या मातीचा आहे, हातात दगड घेऊन कोणाचे तरी रक्त काढण्याऐवजी रक्तदान करून कोणाचा तरी जीव वाचवा. जातीवाद, धर्मवाद हा आपला मूळ स्वभाव नाही तर माणुसकी हा आपला मूळ स्वभाव आहे तो जपा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी डॉ यशवंत राजेभोसले यांनी संदीप पाठक यांच्या जुन्या आठवणी जागवत गुरुकृपा समूहाचा प्रवास मांडला तर संजय मालानी यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या मैत्रीचा परीघ वाढवावा त्यासोबतच प्रत्येकाने कोठे थांबायचे याचे भान ठेवावे असे सांगितले. डॉ विनोद काकडे यांनी गुरुकृपा मधून परिपूर्ण माणूस म्हणून विद्यार्थी निर्माण व्हावेत तसेच या परिवाराचा समाजाच्या विकासासाठी अधिकाधिक विस्तार व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रज्वल म्हस्के यांनी केले, तर सूत्रसंचालन ज्ञानेश्वर सोळंके यांनी केले. यावेळी प्रकाश राजेभोसले, नंदिनी राजेभोसले, डॉ वैशाली काकडे, डॉ प्रियंका राजेभोसले, प्राचार्य अमित बिंदू, प्राचार्य मकेश बाबू आदींची उपस्थिती होती.

**'वऱ्हाड ' ने उडविले हास्याचे कारंजे**

**यावेळी संदीप पाठक यांनी वऱ्हाड निघालय लंडनला या एकपात्री प्रयोगातील काही प्रसंग सादर केले यावेळी सारा परिसर टाळ्या, शिट्ट्या आणि हास्याच्या कारंजांनी भरून गेला.**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

दैनिक
# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • सोमवार दि. १६ मार्च २०२६ •

## थोडक्यात...

### आष्टीचे नायब तहसीलदार भगीरथ धारक यांना मातृशोक



**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील धानोरा येथील रहिवासी आष्टी शहरातील विनायक नगर येथे स्थायिक असलेले आष्टी तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार भगीरथ धारक यांच्या मातोश्री कौशल्या चंद्रभान धारक (वय-९०) यांचे शुक्रवारी पहाटे निधन झाले. सकाळी ११ वाजता त्यांच्या पार्थिवावर धानोरा येथील अमरधाम स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. बापूराव धारक, नायब तहसीलदार भगीरथ धारक, संतोष धारक, गुलाब धारक हे मुले, सुनंदा रामदास दळवी ही मुलगी आहे. दशक्रिया विधी रविवार दि. २२ मार्च रोजी धानोरा येथे होणार आहे .अंत्यविधीला राजकीय , अधिकारी वर्ग, सामाजिक कार्यकर्त्यांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### माजलगाव येथे कांशीरामजी जयंती मोठ्या उत्साहात साजरी: उंटावरून काढली प्रतिमेची मिरवणूक



**माजलगाव। प्रतिनिधी**

बहुजन समाज पार्टीचे संस्थापक अध्यक्ष मान्यवर कांशीराम साहेब यांची ९२ वी जयंती देशभरात साजरी होत असताना दिनांक १५ मार्च २०२६ रोजी बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात बहुजन समाज पार्टीचे जिल्हा प्रभारी अड. अमोल डोंगरे यांनी कांशीरामजी यांच्या जयंतीचे आयोजन केले होते. यावेळी छत्रपती संभाजी महाराज चौक पासुन ते छत्रपती शिवाजी महाराज चौका पर्यंत अड.अमोल डोंगरे यांनी मान्यवर कांशीराम साहेबांची प्रतिमा हातात घेऊन उंटावर बसून वाजत गाजत मिरवणूक काढली. तसेच पुढे छत्रपती शिवाजी महाराज चौकात कांशीराम साहेबांची प्रतिमेचे पूजन अड.अमोल डोंगरे जिल्हा प्रभारी बीड यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच यावेळी बहुजन समाज पार्टी माजलगाव विधानसभा उपाध्यक्ष चंदनलाल बनगे, विधान सभा सचिव हरिभाऊ साळवे, विधानसभा सचिव भैयासाहेब साळवे, माजलगाव शहराध्यक्ष गोविंद वारकड हे उपस्थित होते. यावेळी मान्यवर कांशीराम यांना अभिवादन करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे नेते धम्मानंद साळवे आझाद क्रांती सेनेचे राजेश घोडे, अशोक ढगे सामाजिक कार्यकर्ते रमेश साळवे, रतन लांडगे तात्या पांचाळ, अशोक कांबळे, सचिन वाघमारे, बाबा मुरकुटे, किरण डोंगरे, संजय डोंगरे, रविकांत उघडे, पृथ्वीराज निर्मळ,अमर साळवे, दर्शन डोंगरे बाबासाहेब जाधव,भास्कर शिंदे, नंदकुमार खळगे, सुनिल मगर,आबा सोळंके, आसाराम खंडागळे,अशोक नाडे, दत्ता विसुळे, महादेव बादाडे, सुहास बोराडे, प्रल्हाद दळवी,गोटू वाघमारे, रोहित खुणे, सचिन पाडमुख, सुशांत खरात, दयानंद साळवे, सिताराम सोनवणे, उत्तम गायकवाड,भिसे अतुल डोंगरे, सत्यपाल डोंगरे,अक्षय डोंगरे,राजवीर डोंगरे सह अनेक जणांनी सहभाग नोंदविला.

### गॅस-इंधन टंचाईच्या अफवांवर विश्वास ठेवू नका : विनायक रत्नपारखी



**माजलगाव। प्रतिनिधी**

आखाती भागातील युद्धपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर गॅस, पेट्रोल व डिझेल टंचाईबाबत विविध अफवा पसरवल्या जात असल्याचे दिसून येत आहे. मात्र अशा अफवांवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहन भाजपाचे माजलगाव शहर मंडळ तालुकाध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे. दरम्यान जिल्हा प्रशासनाकडूनही अधिकृत पत्रक प्रसिद्ध करण्यात आले असून इशशव जिल्ह्यात कोठेही गॅस, पेट्रोल किंवा डिझेलची टंचाई नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. घरगुती गॅस तसेच पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत सुरू असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. सोशल मीडियावरील काही पोस्टमुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत असला तरी प्रत्यक्षात गॅस बुकिंग आणि वितरण प्रक्रिया नियमित सुरू आहे. काही ठिकाणी तांत्रिक कारणांमुळे किरकोळ विलंब होऊ शकतो ; मात्र त्यामुळे टंचाई निर्माण झाल्याचे समजणे चुकीचे असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. यासंदर्भात विनायक रत्नपारखी म्हणाले की, जिल्हा प्रशासनाने अधिकृत पत्रकाद्वारे परिस्थिती स्पष्ट केली असून नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाला सहकार्य करावे. कोणत्याही अप्रमाणित माहितीवर किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये. विनाकारण जास्तीचे गॅस सिलेंडर खरेदी करणे किंवा इंधनाचा साठा करणे टाळावे, असेही त्यांनी सांगितले. तसेच काही ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने गॅस सिलेंडर साठवणूक केल्याची माहिती मिळाल्यास पुरवठा विभागाकडून कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांपासून दूर राहून संयम बाळगावा, असे आवाहन विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.

### पत्रकार संघ आणि लाईफस्टाईल जीमच्या वतीने रोजा इफ्तार पार्टी उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर पत्रकार संघ आणि लाईफस्टाईल जीमच्या वतीने शुक्रवार, दिनांक १३ मार्च २०२६ रोजी लाईफस्टाईल जीम,नवी भाजी मंडई येथे रोजा इफ्तार पार्टी मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाली. या कार्यक्रमात पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते.

## विवाहितेला उचलून नेत अत्याचार, चावडीला बांधले...

# बालविवाह प्रकरणी पोलीस पाटील, सरपंच, ग्रामसेवकावर होणार गुन्हे दाखल

**बीड । प्रतिनिधी**

अल्पवयीन महिलेस घरातून नेऊन तिच्यावर अत्याचार करुन बेशुद्ध अवस्थेत चावडीच्या खांबाला बांधल्याच प्रकरण घडलं होतं. या प्रकरणाची दखल महिला आयोगाने घेतली असून पीडित महिला अल्पवयीन असून बालविवाह प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी दिले आहेत.



पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीतील हिवरा पहाडी येथे अल्पवयीन विवाहित महिलेला रात्री उचलून घेऊन जात तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आला. पिडीता बेशुद्ध पडली असताना तिला गावच्या चावडीत खांबाला बांधून ठेवले. ही बात सकाळी गावकऱ्यांच्या नजरेस पडली. त्यानंतर खांबाला बांधलेल्या पीडीतेची सुटका करण्यात आली. सुटका करण्यापूर्वी तिचा व्हिडिओ देखील काढण्यात आला होता. ही घटना राज्यभर गाजली असून महिला आयोगाने या प्रकरणात लक्ष घातले आहे. महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी तपास अधिकाऱ्यांशी फोनवरुन संवाद साधला. आता, पीडित अल्पवयीन महिलेच्या विवाहावरुनही गुन्हा दाखल करण्याचे आदेश तपास अधिकारी अतुल कुमार लांडगे यांना दूरध्वनीवरून दिल्या आहेत. पीडित महिलेच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम १३७(२),३३३,६४(२)(ळ) आणि पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी वैभव पटेकर याला अटक करण्यात आली आरोपीला १७ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या तपासा दरम्यान पीडित मुलीचा गेल्याच वर्षी बालविवाह लावून देण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. या बालविवाहाच्या दृष्टीनेही गुन्हा दाखल करून लग्न लावून देणारे, लग्नास उपस्थित असणारे, पोलीस पाटील, ग्रामसेवक, सरपंच अशा संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचे निर्देशही रुपाली चाकणकर यांनी दिले आहेत.दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश आयोगाच्या अध्यक्षा अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी पोलीस प्रशासनाला दिले आहेत.

## माजी आ. भीमराव धोंडे यांच्या निवासस्थानी 'दावत-ए-इफ्तार' संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

पवित्र रमजान महिन्याच्या औचित्य साधून आष्टी येथे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आलेला 'दावत-ए-इफ्तार' कार्यक्रम शनिवार दि. १४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी उत्साहात व मोठ्या धार्मिक आणि सामाजिक वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमातून सर्वधर्मसमभाव, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याचा सुंदर संदेश देण्यात आला. आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या आष्टी येथील निवासस्थानी हा इफ्तार सोहळा आयोजित करण्यात आला होता. 'माजी आ. भीमराव





धोंडे मित्र मंडळ, आष्टी-पाटोदा-शिरूर' यांच्या वतीने कार्यक्रमाची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली होती. रमजान महिन्यात मुस्लिम बांधव दिवसभर कडक उपवास (रोजा) पाळतात आणि सूर्यास्ताच्या वेळी रोजा सोडण्याच्या प्रक्रियेला 'इफ्तार' असे म्हटले जाते. या इफ्तारच्या निमित्ताने विविध धर्म व समाजातील नागरिक एकत्र येऊन स्नेहभोजन करतात. त्यामुळे समाजात बंधुभाव, सलोखा आणि एकोपा वाढीस लागतो. या प्रसंगी आष्टी शहरासह पंचक्रोशीतील विविध क्षेत्रांतील मान्यवर, राजकीय नेते, समाजसेवक, व्यापारी, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी एकत्रितपणे इफ्तार करून रमजान महिन्याच्या पवित्र वातावरणात परस्परांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमामुळे आष्टी परिसरात सामाजिक सलोखा आणि ऐक्याची भावना अधिक दृढ झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## तू रंगाने काळी म्हणत सासर कडून प्रचंड त्रास; विवाहितेची विष पिऊन आत्महत्या

**माजलगाव। प्रतिनिधी**

तू रंगाने काळी आहेस असे म्हणत सासरच्या मंडळींकडून सातत्याने मानसिक छळ होत असल्याच्या कारणावरून विवाहितेने विष पिऊन आत्महत्या केल्याची घटना तालखेडा येथे घडली आहे.

तालखेडा गावातील ज्योती पवार या महिलेचा विवाह २०१८ मध्ये तळतांडा येथील कृष्णा पवार यांच्याशी झाला होता. लग्नानंतर काही दिवस सर्व काही सुरळीत होते. मात्र त्यानंतर सासरच्या मंडळींकडून पतीच्या व्यवसायासाठी माहेरून पैसे आणण्याचा दबाव टाकत




तिचा छळ सुरू झाल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.सासरच्या मंडळींकडून तू रंगाने काळी आहेस, त्यामुळे आम्हाला आवडत नाहीस, असे म्हणत ज्योतीचा सातत्याने मानसिक छळ केला जात होता. सततच्या छळाला कंटाळून ज्योतीने १२ जानेवारी २०२६ रोजी विष प्राशन केले. त्यानंतर तिला छत्रपती संभाजीनगर आणि नंतर पुणे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान १८ जानेवारी रोजी तिचा मृत्यू झाला. दरम्यान दुःखाने कोसळलेल्या आई-वडिलांनी सुरुवातीला तक्रार दाखल केली नव्हती. मात्र १३ मार्च रोजी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात ज्योतीच्या सासरच्या मंडळींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी तिचा पती कृष्णा पवार, सासरा मनोहर पवार आणि सासू ताराबाई पवार यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पुढील तपास माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस करत असल्याची माहिती देण्यात आली आहे.




*द्वारकाधीश मित्र मंडळातील योगेश भैय्या शेनकुडे यांच्या वाढदिवसानिमित्त पसायदान सेवा प्रकल्प ढेकणमोह येथे प्रकल्प मधील अनाथ मुलांन सोबत पहिला केक कापुन व त्यांना अल्पउपहार वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला यावेळी नगरसेवक सागर भैय्या देशपांडे, गणेश भैय्या गुरखुदे,गुड्डू शेख, आतिश अंधारे,आदेश गायकवाड,कैलास प्रजापती,अभिषेक काळे,सत्यम पवार,कृष्णा राऊत,राजू भोसले,अविनाश कांबळे,प्रशांत साळुंके व द्वारकाधीश मित्र मंडळ ,बीड*

# नगरपालिकेत जसे चार प्रतिनिधी निवडून आणले तसेच जिल्हा परिषदेतही पाठवणार : बाबुराव पोटभरे

### ●बहुजन विकास मोर्चाचा संवाद मेळावा उत्साहात

**माजलगाव। प्रतिनिधी**

बहुजन समाजाच्या हक्कांसाठी एकजूट होऊन लढा देण्याची गरज असून नगरपालिकेत जसे चार प्रतिनिधी निवडून आले तसेच आगामी जिल्हा परिषद निवडणुकांमध्येही बहुजन विकास मोर्चाचे अधिकाधिक उमेदवार निवडून आणण्यासाठी ग्रामीण भागातील तरुणांनी एकत्रितपणे काम करावे, असे आवाहन बहुजन विकास मोर्चाचे नेते बाबुराव पोटभरे यांनी केले. दि. १५ रोजी माजलगाव येथे आयोजित बहुजन विकास मोर्चाच्या कार्यकर्ता संवाद मेळाव्यात ते बोलत होते.



कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे (नाना) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्यास बहुजन समाजातील नागरिक व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना बाबुराव पोटभरे म्हणाले की, हा कार्यक्रम केवळ भोजनाचा नसून बहुजन समाजाच्या विचारांचा आणि संघटन बांधणीचा आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने वर्षातील ३६४ दिवस भारतीय संविधानाचे वाचन करावे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहाने व नाचून साजरी करावी. समाजात जागृती निर्माण करण्यासाठी संविधानाचे विचार प्रत्येक घरापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, सुरुवातीला अनेक प्रस्थापित विरोधकांना असे वाटत होते की बहुजन विकास मोर्चाचा एकही उमेदवार नगरपालिकेत निवडून येणार नाही. मात्र जनतेच्या विश्वासामुळे चार प्रतिनिधी विजयी झाले. हे चार वाघ नगरपालिकेत पोहोचले तसेच आगामी जिल्हा परिषद निवडणुकांमध्येही बहुजन विकास मोर्चाचे अधिकाधिक उमेदवार निवडून आणण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. यावेळी बहुजन विकास मोर्चाच्या वतीने नवनिर्वाचित पाच नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये वडवणीचे नगरसेवक बाबा वाघमारे तसेच माजलगावचे नगरसेवक अभिजीत (भैय्या) पोटभरे, सचिन जावळे, अशोक लांडगे आणि सदानंद (भैय्या) प्रधान यांचा सन्मान करण्यात आला. मेळाव्यात बहुजन समाजातील संघटन बळकट करण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.